# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,

कार्यालयाचे नाव :- अधीक्षक अभियंता, अति उच्च दाब संवसु मंडल, परळी - वै
कार्यालयाचा पत्ता :- जुने पॉवर हाऊस, परळी – वैजनाथ.
ई-मेल आय.डी.:- separli@gmail.com/se2200@mahatransco.in **CIN NO :-** U40109MH2005SGC153646

जा.क्र.अअ/अउदाम/पवै/मासं/ दिनांक :-२४.०८.२०२३

## जाहीर सुचना

मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन फक्त विजतंत्री (Electrician) या व्यवसायात उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अउदा संवसु मंडळ, महापारेषण परळी वै. या कार्यालया अंतर्गत येणा-या अउदा संवसु विभाग, बीड, लातूर, नांदेड, तथा ४०० केव्ही ग्र.कें. संवसु विभाग गिरवली व कुंभारगाव या आस्थापनेवरील वर्ष २०२३-२४ करीता एक वर्ष कालावधीसाठी शिकाऊ उमेदवारीकरीता भरती प्रक्रीया राबवायची आहे. करीता पात्र उमेदवारांनी www.apprenticeship.gov.in या संकेत स्थळावर कराखध्द पध्दतीने शिकाऊ उमेदवारा करीता दिनांक २५.०८.२०२३ ते दिनांक ०४.०९.२०२३ च्या रात्री ११.५९ वाजेपर्यंत खालील रकाना क्रं. ३ मध्ये नमुद आस्थापना नोदंणी क्रमांकावर (Apply) अर्ज सादर करावे. आस्थापना नोदंणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | आस्थापना नोदंणी (रेजीस्ट्रेशन) क्रमांक | ट्रेड (व्यवसाय) | विभागाचे नाव | कार्यक्षेत्र | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अउदा संवसु मंडळ, परळी वै. | E११९६२७०३२२२ | **विजतंत्री Electrician** **एकुण १३७ जागा** | अउदा संवसु विभाग, बीड. | बीड/धाराशिव जिल्हा | ५४ |
| २ | | | | अउदा संवसु विभाग, लातूर. | लातूर जिल्हा | २९ |
| ३ | | | | अउदा संवसु विभाग, नांदेड. | नांदेड जिल्हा | ३१ |
| ४ | | | | ४०० केव्ही ग्र.कें. संवसु विभाग, गिरवली. | बीड जिल्हा | १५ |
| ५ | | | | ४०० केव्ही ग्र.कें. संवसु विभाग, कुंभारगाव. | नांदेड जिल्हा | ०८ |

१. **शैक्षणिक अर्हता :-**
   - अ. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.
   - ब. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

२. **शैक्षणिक** प्रमाणपत्रे/कागदपत्रे (लागू असल्याप्रमाणे) :- १) एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री दोन सेमिस्टरचे/चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची प्रत. २) शाळा सोडल्याचा दाखला ३) आधारकार्ड ४ मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र ५) महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र ६) प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र - नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अजा,व अज या प्रवर्गातील उमेदवार वगळून) ७) आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्रांची मुळ साक्षांकित प्रत उमेदवाराने स्वत:च्या प्रोफाईलवर सुस्पष्ट दिसेल अशा स्वरुपात स्कॅन करुन अपलोड करावे.

३. विद्यावेतन :- प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

४. नमुद पद संख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास, वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल/अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितिने सुस्पष्ट स्वरुपात दिसेल असे अपलोड करणे बंधनकारक राहील. वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्त नमुद कालावधीच्या नंतर केलेल्या (Online) अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

७. अपूर्ण, चुकीचे व अपु-या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अथवा त्यांचा विचार केल्या जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चूकिची अथवा खोटी आढळूण आल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

८. एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री गुणपत्रिकेवरील नाव हे आधारकार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९. वयोमर्यादा दि. ०४.०९.२०२३ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम)

१०. ऑनलाईन अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.

११. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. परीक्षेचे मिळून एकूण प्राप्त गुणांच्या ५०% सरासरीच्या आधारे गुणवत्ते यादी नुसार सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांस या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३. या आधी ज्या उमेदवारानी वरील आस्थापना नोंदनी क्रमांकावर दिनांक २५.०८.२०२३ पुर्वी ऑनलाईन (Online Apply) अर्ज सादर केलेले असतील अशा उमेदवारांनी (Online Apply) केल्याचा कागदोपत्री पुरावा (Screen shoot) प्रपत्र अ मध्ये भरुन सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१४. सदर भरती प्रक्रियेकरिता दि. २५.०८.२०२३ ते ०४.०९.२०२३ या कालावधी दरम्यान ऑनलाईन (Online Apply) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या नंतर म्हणजेच दि. ०४.०९.२०२३ रोजीच्या नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा भरती/निवड प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही याची सुध्दा नोंद घ्यावी.

१५. शिकाऊ उमेदवार भरतीसाठी प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या उमेदवाराने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रीकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

१६. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

१७. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीराती सोबत जोडलेले **प्रपत्र अ** स्वच्छ अक्षरात परीपूर्ण भरुन उपरोक्त नमुद केलेल्या आस्थापनेवर (Online Apply) केलेल्या अर्जाची प्रत व मुद्या क्र. ०२ मध्ये नमुद आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत/स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती दि. ०८.०९.२०२३ पुर्वी अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु मंडळ, जुने पॉवर हाऊस, वैद्यनाथ मंदिर रोड,परळी वै. ४३१५१५. या पत्यावर साध्या टपालपोस्टव्दारे किंवा स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठवावेत.तसेच सदर प्रपत्र आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपल्या अर्जाचा भरती/निवड प्रक्रीयेसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**टिप-: कार्यालयीन वेळ : १०:०० ते ०६:१५ या वेळेतच अर्ज स्विकारले जातील. सुटटीच्या दिवशी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.**

**स्वाक्षरी /-**
**अधिक्षक अभियंता**
**अउदा संवसु मंडळ, परळी वै.**

**सहपत्र : प्रपत्र अ**

## प्रपत्र अ

### अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, महापारेषण, परळी वै. अंतर्गत सन २०२३-२४ साठी शिकाऊ उमेदवार भरती करिता करावयाचा अर्जाचा नमुना.

उमेदवाराचा अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटो चिकटवून त्यावर स्वाक्षरी करावी

<table>
<tr><td>१</td><td>Apprentice Registration Number</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>उमेदवाराचे पुर्ण नाव</td><td>------------------------------------------------------------<br><br>(आडनाव) (उमेदवाराचे नाव) (वडीलनांचे/पतीचे नाव)</td></tr>
<tr><td>३</td><td>लिंग व वैवाहीक स्थिती (लागू असलेल्या ठिकाणी √अशी खुण करावी)</td><td><table><tr><td>(स्त्री)</td><td>(पुरुष)</td><td>(विवाहीत)</td><td>(अविवाहीत)</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>४</td><td>उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता</td><td>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>-------------------------------------पिनकोड :-</td></tr>
<tr><td>५</td><td>दुरध्वनी/मोबाईल क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>ई-मेल आयडी</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>जन्म दिनांक<br>(अंकामध्ये)</td><td>DD MM YYYY<table><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>८</td><td>जातीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी √अशी खुण करावी)</td><td><table><tr><td>अजा</td><td>अज</td><td>विजाअ</td><td>भजब</td><td>भजक</td><td>भजड</td><td>विमाप्र</td><td>ईमाव</td><td>ईडब्लूएस</td><td>खुला</td></tr><tr><td>SC</td><td>ST</td><td>VJA</td><td>NTB</td><td>NTC</td><td>NTD</td><td>SBC</td><td>OBC</td><td>EWS</td><td>OPEN</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
</table>

### शैक्षणिक पात्रता (प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात)

| अ. क्र. | परिक्षेचे नाव | शाळा/मंडळ/विदयापीठ/संस्थेचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | परिक्षेतील एकूण गुण | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी | | | | | |
| २ | आय.टी.आय. (विजतंत्री) | | | | | |

E:\Manager (HR) Parli 14.06.2016\Apperntchsip Corrospondance\Appretincship 2023-24\Advertisement 23-24.docx

**जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्रे** (लागू असलेल्या ठिकाण √ अशी खुण करावी)

| | | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी.गुणपत्रिका | | |
| २ | एस.एस.सी. प्रमाणपत्र (सनद) | | |
| ३ | आय.टी.आय.गुणपत्रिका (सर्व सेमिस्टर गुणपत्रिका) | | |
| ४ | शाळा सोडल्याचा दाखला | | |
| ५ | आधार कार्ड | | |
| ६ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र | | |
| ७ | प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non Creamy layer) (अनु जाती/अनु जमाती वगळून) | | |
| ८ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र | | |
| ९ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक उमेदवारांकरीता शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले (EWS) प्रमाणपत्र. | | |

## स्वघोषणापत्र

मी ------------------------------------------- महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, परळी वै. या कार्यालयाची शिकाऊ उमेदवार भरतीबाबतची प्रसारीत केलेली जाहीरात काळजीपुर्वक वाचली असून जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. दिलेल्या अर्जात भरलेली संपूर्ण माहिती खरी व योग्य आहे. सदर माहिती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच माझी निवड झाल्यास मी अउदा संवसु मंडळ, परळी वै. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात (बीड, लातूर, धाराशिव व नांदेड, या जिल्हयामध्ये) कुठल्याही ठिकाणी रुजू होण्यास तयार आहे.

स्थळ :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी